# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

**प्रस्तावना**

उमेद अभियानाचे मुख्य लक्षगट हे जाती जमाती, विधवा परितक्त्या,दिव्यांग,वृध्द व दुर्लक्षित व जोखीमप्रवण घटक असून त्याचे सुनियोजित पध्दतीने सामाजिक समानेशन आधारीत समुहाय स्तरीय संस्था अभियानातर्गत तयार करण्यात येतात व गावातील प्रत्येक कुटुंबाच्या अर्थिक , सामाजीक व संस्कृतीक विकासासाठी प्रयत्नयशिल राहुन अभियानातील प्रत्येक कुटुंबाची क्षमता विकसीत करण्यावर अभियानामध्ये भर देण्यात येतो.

**स्वयंसहाय्यता समूह म्हणजे**

समाजातील गरीब कुटूंबातील - तसेच अपंग , विधवा, निराधार ,परितक्त्या ,एकल स्त्री, इ.वंचित घटकातील कमीत कमी १० महिलांना एकत्र करुन जी संस्था निर्माण केली जाते. त्यास स्वयंसहाय्यता समुह असे म्हणतात . सदर समुहाची शासनाच्या NRLM PORTAL होवून ३ महिने झाल्यानंतर रु.१५,०००/-  फिरता निधी आणखी ३ महिण्यानंतर बँकिंगव्द्रारे रु. १,००,००० अल्प दराने कर्ज देण्यात येते . वेळेवर कर्ज परतफेड केल्यास व्याजदराची रक्कम परत केली जाते.

**समुहाचे फायदे**

१) महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ.
२) दैनंदिन जीवनातील छोट्या छोट्या अर्थिक गरजाची समुहात पूर्तता.
३) मोफत विविध प्रशिक्षणे.
४) उत्पादित उत्पादनाच्या विक्रीस योग्य संधी.
५) समुहातील उत्पादनाच्या सरस विक्री प्रदर्शनात संधी.

**अभियानामार्फत मिळणारे फायदे**

१) फिरता निधी , २) मुख्य कर्ज पुरवठा (व्याजानुदान)

**ग्रामसंघ -** गावातील स्थापण झालेल्या स्वयंसहाय्यता समुहाचे संघटन म्हणजे ग्रामसंघ होय.

| **ग्रामसंघाला मिळणारे फायदे -** | **पहीला हप्ता** | **दुसरा हप्ता** |
|---|---|---|
| ग्रामसंघ व्यवस्थापन निधी | रु. ५५,०००/- | रु. २०,०००/- |
| सामुदायिक गुंतवणूक निधी | रु. ६०,०००/- | रु. ९०,०००/- |
| जोखिम प्रणवता निधी (VRF) | रु. १,५०,०००/- | |

योजनेतंर्गत ३ महिण्यासाठी मोफत प्रशिक्षण तर ३ महिण्यानंतर रोजगार (Placement) ची हमी दिली जाते.

**प्रभागसंघ म्हणजे**

जिल्हा परिषद प्रभागातील कार्यरत असणा-या पाच किंवा त्यापेक्षा अधिक ग्रामसंघाचा मिळुन प्रभाग संघाची निर्मीती केली जाते. प्रभागातील ग्रामसंघाचे संघटन म्हणजे प्रभागसंघ होय प्रत्येक प्रभागसंघाला शासनामार्फत रु.३,५०,०००/- लाखाच्या व्यवस्थापन निधी देण्यात येतो.

**१) मोफत व्यवसायभिमुख प्रशिक्षण आरसेटी रायगड**
**२) पंडीत दिनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना**